# लपून - छपून टीका काय करताय हिंमत असेल तर समोर येऊन चर्चा करा

## सफाई कामगारप्रश्नी नगरसेवक वैभव गायकवाड यांचे विरोधकांना आव्हान

**नवी मुंबई** । प्रतिनिधी

नवी मुंबई महापालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांना समान कामास समान वेतन मिळालेच पाहिजे, अशी भूमिका पालकमंत्री ना. गणेश नाईक यांनी घेतली आहे. या कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सुप्रीम कोर्टापर्यंतही जाऊ असा निर्धारही ना. नाईक यांनी केला आहे. पण फक्त विरोधाला विरोध करायचे म्हणून ना. नाईक यांच्या या भूमिकेवर काँग्रेसने टीका केली होती. काँग्रेसच्या या भूमिकेचा मात्र, राष्ट्रवादीने जोरदार समाचार घेतला आहे.

सफाई कामगारांची बाजू घेणाऱ्या राष्ट्रवादीवर टीका करणाऱ्या काँग्रेस नेत्याने लपून - छपून टीका करण्यापेक्षा हिंमत असेल तर समोर येऊन चर्चा करावी असे प्रत्युत्तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक वैभव गायकवाड यांनी एका वृत्तपत्रात या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातमीवर प्रतिक्रिया देताना दिले आहे. या काँग्रेसच्या नेत्यांनी पुढे येऊन आपल्याबरोबर या विषयावर चर्चा करावी असे खुले आव्हान नगरसेवक गायकवाड यांनी दिले आहे. जर ते पुढे आले तर सफाई कामगारांच्या बाजूने आणि विरोधात कोण आहे हे समजून येईल, असेही गायकवाड यांनी म्हटले आहे. ५५० कंत्राटी कामगारांमुळे १२ लाख नागरिकांना भुर्दंड का असेही वक्तव्य या काँग्रेस नेत्याने केले आहे. यावर नगरसेवक गायकवाड यांनी हे कामगारही या १२ लाख लोकांमधीलच आणि नवी मुंबईतीलच आहेत हे त्यांनी विसरू नये असे स्पष्ट केले.

वैभव गायकवाड यांनी सांगितले की, महानगर पालिका क्षेत्रात अँन्थोनी ठेकेदाराकडे घंटागाडीवर सफाईकाम करणाऱ्या कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. या कामाचे कंत्राट २००७ ते २०१२ या कालावधीसाठी होते. तर समान कामास समान वेतन हे धोरण ना. गणेश नाईक यांच्या निर्देशानुसार पालिकेने २०१० साली स्विकारले. यावेळी इतर कामगारांना हे धोरण लागू झाले. मात्र, अँन्थोनी ठेकेदाराकडे असलेल्या ५५० कंत्राटी कामगारांचे कंत्राट २०१२ ला संपत असल्याने त्यांना समान कामास समान वेतन हे धोरण लागू झाले नाही. हे कंत्राट आता संपल्याने या कामगारांनाही या धोरणाचा लाभ मिळावा अशी आमची भूमिका असल्याचेही गायकवाड म्हणाले. तर ना.गणेश नाईक यांनी शासन स्तरावर या धोरणाचा प्रस्ताव मांडावा असे म्हणणाऱ्या काँग्रेसच्या नेत्याचाही यावर नगरसेवक गायकवाड यांनी



समाचार घेतला आहे.

शहरातील कचरा उचलण्याचे आणि तो वाहून नेण्याचे काम हे पालिकेच्या खर्चातून होते. राज्य सरकार यासाठी कसलेही अनुदान देत नाही. मग हे धोरण राज्य सरकार कसे ठरवू शकेल असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. समान कामास समान वेतन या धोरणाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार फक्त पालिकेलाच आहे, अशा शब्दात नगरसेवक गायकवाड यांनी या आरोपाला प्रत्युत्तर दिले.

महानगर पालिका क्षेत्रात सफाई कामाच्या ठेक्याअंतर्गत अँन्थोनी या ठेकेदारामार्फत सफाई काम केले जात असे. यादरम्यान शहरातील घनकचरा व्यवस्थापन पद्धतीला अद्ययावत करण्यासाठी महापौर सागर नाईक यांच्या संकल्पनेतून प्रशासनाने नवीन प्रस्ताव तयार केला होता. मात्र त्याविरोधात आक्षेप घेत काँग्रेस नगरसेवकांनी मुख्यमंत्र्यांकडे याबाबत तक्रार करून नव्या ठेक्यात खो घातला होता. विरोधकांच्या या प्रकारामुळे ठेक्याची मुदत संपूनही अँन्थोनी या ठेकेदार कंपनीलाच पर्यायी मुदतवाढ मिळाली होती. नवी मुंबईकरांनाही त्यामुळे प्रचंड त्रास झाला होता. अखेर नुकतेच या प्रकरणाची चौकशी अहवालातील सूचनेनुसार नवा प्रस्ताव करून पालिका प्रशासनाने महासभेपुढे मांडला होता. त्यामध्ये चौकशी समितीने सुचित केल्यानुसार सफाई कामगारांना समान कामास किमान वेतन देण्याची बाब नमूद होती. मात्र सत्ताधारी नगरसेवकांनी या बाबीला नकार देत पालकमंत्री ना. गणेश नाईक यांच्या धोरणाप्रमाणेच कामगारांना समान कामास समान वेतन ही भूमिका ठाम ठेवत चौकशी समितीने सुचित केलेली बाब बहुमताने फेटाळली. मात्र याचदरम्यान अँन्थोनी ठेकेदाराने शहरातील सफाई कामात असमर्थता दर्शवत कामाला नकार दिल्याने सुमारे ५५० कंत्राटी कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. अँन्थोनी ठेकेदारामुळे त्रस्त झालेल्या या सफाई कामगारांनी पालकमंत्री ना. गणेश नाईक यांची भेट घेतली.

> सफाई कामगारांना समान कामास समान वेतन मिळावे या राष्ट्रवादीच्या भूमिकेला विरोध करणाऱ्या काँग्रेस नेत्याने हिम्मत असेल तर पुढे येऊन चर्चा करावी.
>
> **- वैभव गायकवाड**
> **नगरसेवक, नमुंमपा**

याप्रसंगी इतर कामगारांना समान कामास समान वेतन मिळत असताना आपल्याला मात्र किमान वेतन मिळेल का? अशी चिंता कामगारांनी व्यक्त केली. यावेळी ना. गणेश नाईक यांनी सर्व कामगारांना समान कामास समान वेतन मिळावे अशीच आपल्या धारणा असल्याचे सांगितले. मात्र विरोधकांमुळे केवळ या सफाई कामगारांना किमान वेतन मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे झाल्यास सफाई कामगारांना मिळणारे वेतन ११ हजारावरून थेट ५ हजार होण्याची शक्यता आहे.

परंतु सफाई कामगारांच्या पाठीशी आपण असून त्यांना समान कामास समान वेतनच मिळावे यासाठी आपण आवश्यकता भासल्यास ही लढाई सुप्रीम कोर्टापर्यंत देखील नेवू अशी ग्वाही पालकमंत्री ना. नाईक यांनी दिली आहे.